ePaper

| वर्ष - 9 । अंक -53 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

www.mahaenews.com । बुधवार दि. 15 ऑक्टोबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## अमेरिका संकटात, भारताकडे मागितली मोठी मदत, डोनाल्ड ट्रम्प तोंडावर




### आतील पानांत

- टीम इंडियाची वर्ल्ड रेकॉर्डशी बरोबरी
- धोनी, रोहित, कोहलीची परंपरा कायम!
- पाकिस्तानचे १०० हून अधिक सैनिक ठार
- जबाबदार अधिकाऱ्यांना अटक करा!


### स्थानिक स्वराज्य संस्थां निवडणुकांची तयारी जोरात!

# “एकला चलो रे”चा नारा राज्यभर!

## काही ठिकाणी आघाडी, तर कुठे युतीचे संकेत!

। पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज

**राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा (LOCAL BODY ELECTION UPDATE) बिगुल पुढील महिन्याच्या अखेरीस वाजण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मिनी मंत्रालयासह महापालिका, नगरपालिकांच्या निवडणुकांचा नारळ पुढील महिन्यात फुटण्याची दाट शक्यता आहे. यापूर्वी राज्य निवडणूक आयोगाला या निवडणुकीविषयी सुप्रीम फटकारे बसले आहेत. दरम्यान राज्यात स्वबळाचे नारे उंचावल्याचे एकंदरीत चित्र आहे. महायुती आणि महाविकास आघाडीचा धर्म स्थानिक पातळीवर पाळल्याच जाईल असे वाटत नाही. अनके ठिकाणी स्थानिक नेत्यांनी युती आणि आघाडीऐवजी एकला चलो रेचा नारा दिला आहे. तर काही ठिकाणी त्यांनी युती, आघाडीची तयारी सुरू केली आहे. राज्यातील काही ठिकाणची ही वानगी दाखल उदाहरणं स्थानिक पातळीवरील राजकीय घडामोडींची नांदी दाखवत आहेत.**





राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल पुढील महिन्यात वाजण्याची शक्यता अनेक ठिकाणी स्वबळाचा नारा, काही ठिकाणी युतीची हालचाल
जळगावपासून गडचिरोलीपर्यंत राजकीय रणसज्जता

### जळगावमध्ये शिंदे सेनेचा वरचष्मा

जळगाव जिल्ह्यातील पाचोरा, भडगाव मतदार संघात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका शिवसेना स्वबळावर लढेल अशी घोषणाच करून टाकली आहे. शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार किशोर पाटील यांनी हे वक्तव्य केलं आहे. शिवसेना भाजप सोबत युती करणार नाही असेही किशोर पाटील म्हणाले. त्यांच्या या वक्तव्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी असलेले अमोल शिंदे यांनी अपक्ष म्हणून माझ्या विरोधात दोनदा निवडणूक लढवली. आतून बाहेरून टेबलाखालून त्यांना मदत केली जाते हे सर्वश्रुत आहे असे किशोर पाटील म्हणाले. युती करूनही पाठीत खंजीरच खुपसत असणार तर समोरासमोर असल्यावर सावध तरी राहतो अशी प्रतिक्रिया किशोर पाटील यांनी दिली.

पाठीत खंजीर खुपसून स्वतःचा मडर करून घेण्यापेक्षा समोरासमोर लढलेलं बरं. मी माझ्या मतदारसंघात युती करणार नाही, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पाचोरा, भडगाव मतदार संघात शिवसेना स्वबळावर लढणार. महाराष्ट्रातला मी पहिला आमदार असेल मी माझ्या मतदारसंघात युती होऊ देणार नाही, स्वबळावर लढेल. जेवढे माझ्या विरोधात लढले त्यांना कळालं दोन टर्म पासून आपण किशोर पाटीलला थांबवू शकत नाही.

### विरोधकांशी युती कशी करू?

सर्वांनी एकत्र येऊन किशोर पाटीलला थांबवायचा प्रयोग केला आहे. मात्र पाचोरा भडगाव मतदार संघातील जनता आणि शिवसैनिक माझ्या पाठीशी खंबीर उभे आहे.बुथप्रमुखांच्या मेळाव्यात मी घोषणा केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पाचोरा, भडगाव मतदार संघात शिवसेना स्वबळावर लढेल. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या स्टेटमेंट बघितले तर ज्या ज्या मतदार संघामध्ये जशी परिस्थिती आहे त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार आहे. माझ्या मतदारसंघातील भारतीय जनता पक्ष जर उद्या माझी खाट टाकणार असेल, जे माझ्या विरोधात लढले ते सर्व विरोधक एक केले. मी त्यांच्यासोबत कसे लढायचे? सर्व माझ्या विरोधात लढले मी त्यांच्याशी युती कशी करू. सर्व जरी एकत्र आले तरी दूधच दूध आणि पाणीच पाणी होईल.

### रेखा मालचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार

पाचोरा भडगाव मतदार संघातील दोघेही नगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या 100% जागांवर शिवसेनेचा भगवा फडकेल. भडगाव नगरपालिकेची महिला एसटी प्रवर्गाची जागा निघाली आहे, त्या जागेवर मी उमेदवारी घोषीत केली आहे. रेखा प्रदीप मालचे यांना मी भडगाव नगरपालिकेची लोकनियुक्त नगराध्यक्ष पदाची उमेदवारी दिली आहे.

पाचोरा नगरपालिकेचा विषय मी कार्यकर्त्यांवर सोडला आहे. अर्ध्या कार्यकर्त्यांचं म्हणणं आहे की माझ्या पत्नीला द्यावे तर अर्ध्यांचं म्हणणं आहे माझ्या मुलीला उमेदवारी द्यावी. एक नोव्हेंबरला माझ्या वाढदिवसाच्या दिवशी मी निर्धार मेळावा ठेवला आहे. त्या दिवशी ही उमेदवारी जाहीर करेल, असे आमदार किशोर पाटील यांनी जाहीर केले आहे.

### नाशिकमध्ये स्वबळाचा नारा?

नाशिक महापालिका निवडणुकीत भाजपाचा स्वबळाचा नारा दिसू शकतो. भाजपाने सगळ्या 122 जागा स्वबळावर लढवाव्यात असे पत्र भाजप शहराध्यक्ष सुनील केदार यांनी मुख्यमंत्र्यांना आणि प्रदेशाध्यक्षांना पाठवले आहे. नाशिकमध्ये भाजपची मोठी ताकद आहे. भाजपाला इतर कोणाच्याही कुबड्या घेण्याची आवश्यकता नाही. बूथ पातळीवर भाजपची स्वतःची संपूर्ण यंत्रणा सज्ज आहे.

## रायगडमध्ये सेना-राष्ट्रवादी एकत्र

रायगडमध्ये झेडपी निवडणुकीत शिवसेना-राष्ट्रवादी युतीची शक्यता आहे. जागावाटपाचा फॉर्म्युला तयार असल्याची माहिती मंत्री भरत गोगावले यांनी दिली. झेडपी निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेससोबत युती करण्यास शिवसेना (शिंदे गट) तयार असल्याचं मंत्री भरत गोगावले यांनी स्पष्ट केलं आहे. गोगावले यांनी सांगितलं की, युतीसाठी जागा वाटपाचा फॉर्म्युला तयार असून तो राष्ट्रवादीसमोर ठेवण्यात आला आहे. आता राष्ट्रवादी या प्रस्तावावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. रायगडच्या झेडपी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या वक्तव्यानं राजकीय वातावरण तापलं आहे.

गुन्हेगारी घालणारा व्हिडिओ

## पोलिसांनी रिल्स स्टार ला घडवली अद्दल

# गुन्हेगारी पद्धतीने फटका स्टॉलचं प्रमोशन

### रिल्स स्टारला ठाण्यात आणून समज

। पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**दिवाळी काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. दिवाळी सणानिमित्त फटाक्यांची आतिषबाजी काही नवीन नाही. मोठ्या उत्साहात दिवाळी सण साजरा केला जातो. परंतु, फटाक्यांच्या दुकानाच हटके आणि गुन्हेगारी पद्धतीने प्रमोशन करणे रिल्स स्टार ला महागात पडलं आहे. वाकड पोलिसांनी प्रोमोशन करणाऱ्या रिल्स स्टार ला पोलीस ठाण्यात आणून समज दिली आहे.**



सध्या स्पर्धेच युग आहे, असं म्हणलं जात. कुठलाही व्यवसाय करायचं म्हटलं की जाहिरात आणि प्रोमोशन आलंच. दिवाळी काही दिवसांवर असल्याने अनेकांनी फटाक्यांची दुकानं थाटली आहेत. दुकानांच इन्स्टाग्रामवर वेगवेगळ्या पद्धतीने प्रोमोशन केलं जातं आहे. इन्स्टग्राम हे प्रमोशन आणि जाहिरातीच माध्यम झालं आहे.वाकडमधील तरुणाने फटाक्यांच्या दुकानाचे गुन्हेगारी पद्धतीने व्हिडिओ बनवून प्रोमोशन केलं. व्हिडिओ हिट झाला. व्हिडिओ पोलिसांपर्यंत पोहचला आणि वाकड पोलिसांनी संबंधित रिल्स स्टार ला पोलीस ठाण्यात आणून चांगली समज दिली आहे.“रिल्स स्टार असलेल्या तरुणाने हात जोडून माफी मागितली. गुन्हेगारी प्रवृत्तीला खतपाणी घातलं जाईल असे व्हिडिओ कुणीही बनवू नयेत अस आवाहन केलं आहे.”“गुन्हेगारीला कृत्याला खतपाणी घालणारे व्हिडिओ कुणीही बनवू नयेत. समाजात वेगळा ठसा उमटला जातो. असे प्रमोशन करू नये. व्हिडिओ बनवू नयेतदिवाळी काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. दिवाळी सणानिमित्त फटाक्यांची आतिषबाजी काही नवीन नाही. मोठ्या उत्साहात दिवाळी सण साजरा केला जातो. परंतु, फटाक्यांच्या दुकानाच हटके आणि गुन्हेगारी पद्धतीने प्रमोशन करणे रिल्स स्टार ला महागात पडलं आहे. वाकड पोलिसांनी प्रोमोशन करणाऱ्या रिल्स स्टार ला पोलीस ठाण्यात आणून समज दिली आहे. सध्या स्पर्धेच युग आहे, असं म्हणलं जात. कुठलाही व्यवसाय करायचं म्हटलं की जाहिरात आणि प्रोमोशन आलंच. दिवाळी काही दिवसांवर असल्याने अनेकांनी फटाक्यांची दुकानं थाटली आहेत. दुकानांच इन्स्टाग्रामवर वेगवेगळ्या पद्धतीने प्रोमोशन केलं जातं आहे. इन्स्टग्राम हे प्रमोशन आणि जाहिरातीच माध्यम झालं आहे.वाकडमधील तरुणाने फटाक्यांच्या दुकानाचे गुन्हेगारी पद्धतीने व्हिडिओ बनवून प्रोमोशन केलं. व्हिडिओ हिट झाला. व्हिडिओ पोलिसांपर्यंत पोहचला आणि वाकड पोलिसांनी संबंधित रिल्स स्टार ला पोलीस ठाण्यात आणून चांगली समज दिली आहे.“रिल्स स्टार असलेल्या तरुणाने हात जोडून माफी मागितली. गुन्हेगारी प्रवृत्तीला खतपाणी घातलं जाईल असे व्हिडिओ कुणीही बनवू नयेत अस आवाहन केलं आहे.”“गुन्हेगारीला कृत्याला खतपाणी घालणारे व्हिडिओ कुणीही बनवू नयेत. समाजात वेगळा ठसा उमटला जातो. असे प्रमोशन करू नये. व्हिडिओ बनवू नयेत. गुन्हेगारी प्रवृत्तीला खतपाणी घातलं जाईल असे व्हिडिओ कुणीही बनवू नयेत अस आवाहन केलं आहे.”“गुन्हेगारीला कृत्याला खतपाणी घालणारे व्हिडिओ कुणीही बनवू नयेत. समाजात वेगळा ठसा उमटला जातो. असे प्रमोशन करू नये. व्हिडिओ बनवू नयेतदिवाळी काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. दिवाळी सणानिमित्त फटाक्यांची आतिषबाजी काही नवीन नाही. मोठ्या उत्साहात दिवाळी सण साजरा केला जातो. परंतु, फटाक्यांच्या दुकानाच हटके आणि गुन्हेगारी पद्धतीने प्रमोशन करणे रिल्स स्टार ला महागात पडलं आहे.प्रोमोशन करणाऱ्या रिल्स स्टार ला पोलीस ठाण्यात आणून समज दिली आहे. सध्या स्पर्धेच युग आहे, असं म्हणलं जात. कुठलाही व्यवसाय करायचं म्हटलं की जाहिरात आणि प्रोमोशन आलंच.

### व्हिडिओ बनवून प्रोमोशन केलं

दिवाळी काही दिवसांवर असल्याने अनेकांनी फटाक्यांची दुकानं थाटली आहेत. दुकानांच इन्स्टाग्रामवर वेगवेगळ्या पद्धतीने प्रोमोशन केलं जातं आहे. इन्स्टग्राम हे प्रमोशन आणि जाहिरातीच माध्यम झालं आहेतरुणाने फटाक्यांच्या दुकानाचे गुन्हेगारी पद्धतीने व्हिडिओ बनवून प्रोमोशन केलं. व्हिडिओ हिट झाला. व्हिडिओ पोलिसांपर्यंत पोहचला आणि वाकड पोलिसांनी संबंधित रिल्स स्टार ला पोलीस ठाण्यात आणून चांगली समज दिली.

# प्रारूप मतदारयादीवर हरकतींसाठी मुदतवाढ

## 31 ऑक्टोबर रोजी अंतिम मतदारयादी जाहीर केली जाणार

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**जिल्ह्यातील नगरपरिषदा आणि नगरपंचायतीच्या प्रारूप मतदारयादीवर हरकती-सूचना नोंदविण्यास मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य निवडणूक आयोगाने केलेल्या सूचनेनुसार ही मुदत येत्या शुक्रवारपर्यंत (१७ ऑक्टोबर) वाढविण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.**



जिल्ह्यातील चौदा नगरपरिषदा आणि तीन नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आठ ऑक्टोबर रोजी प्रारूप मतदारयादी जाहीर करण्यात आली होती. त्यावर हरकती-सूचना नोंदविण्यासाठी सोमवार पर्यंत (१३ ऑक्टोबर) मुदत देण्यात आली होती. मात्र, हरकती-सूचना नोंदविण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. प्रारूप मतदारयादीवरील हरकती-सूचना नागरिकांनी शुक्रवारपर्यंत द्याव्यात, असे आवाहन नगरपालिका शाखेचे प्रशासकीय अधिकारी व्यंकटेश दुर्वास यांनी केले आहे.नागरिकांकडून प्राप्त झालेल्या हरकती आणि सूचनांवर विचार करून येत्या ३१ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदारयादी जाहीर केली जाणार आहे.

नागरिकांच्या सूचना आणि हरकती संबंधित नगरपरिषद तसेच नगरपंचायत कार्यालयात स्वीकारण्यात येणार असल्याचे दुर्वास यांनी स्पष्ट केले.दरम्यान, जिल्ह्यातील नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या नगराध्यक्षपदासाठीचे आरक्षण गेल्या आठवड्यात निश्चित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील चौदा नगरपरिषदांपैकी चार ठिकाणी आणि चार नगरपंचायतींपैकी तीन ठिकाणच्या नगराध्यक्षपदावर महिलांना संधी मिळणार आहे.

### मतदारयादीवर हरकती-सूचना

आठ नगरपरिषदांची नगराध्यक्षपदे सर्वांसाठी खुली राहणार आहेत. जिल्हा प्रशासनाकडून यापूर्वीच नगर परिषदा आणि नगरपंचायतींच्या प्रारूप प्रभागरचनेचा आराखडा तयार करण्यात आला आहे. जिल्ह्यातील नगरपरिषदा आणि नगरपंचायतीच्या प्रारूप मतदारयादीवर हरकती-सूचना नोंदविण्यास मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य निवडणूक आयोगाने केलेल्या सूचनेनुसार ही मुदत येत्या शुक्रवारपर्यंत (१७ ऑक्टोबर) वाढविण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.

वाहनचालकांना शिक्षा

पिंपरी महापालिकेचा वाहतूक बेटाचा प्रयोग

# वाहतूक कोंडीने नागरिक हैराण!

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकाच्या चारही रस्त्यांवर एक किलोमीटर रांगा

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकात (मोरवाडी) महापालिकेने केलेला वाहतूक बेटाचा प्रयोग वाहनचालकांच्या मुळावर उठला आहे. चौकाच्या चारही रस्त्यांवर एक किलोमीटर रांगा लागत आहेत. महापालिकेच्या आडमुठ्या भूमिकेमुळे वाहन चालकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. नागरिकांची गैरसोय होत असतानाही महापालिकेने ठेकेदारांसाठी वाहतूक बेट उभारल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.**



मोरवाडी चौकातून पिंपरी गाव, चिंचवड, नेहरूनगर, लांडेवाडी, भोसरी, मोशीकडे जाता येते. हा चौक अतिशय वर्दळीचा आहे. गेल्या काही दिवसांपासून मात्र या चौकात सतत वाहतूक कोंडी होत आहे. चौकातच दोन ते तीन मोठी आस्थापने आहेत. दिवाळीनिमित्त खरेदीसाठी नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे. खरेदीसाठी येणारे नागरिक मेट्रो खाली असलेल्या मोकळ्या जागेत पार्किंग करत आहेत. रिक्षा आणि खासगी वाहने देखील रस्त्यावरच उभी केली जात आहेत. यामुळे वाहनांच्या लांबच-लांब रांगा लागल्याचे दिसून येते. शहरी पथ धोरणांतर्गत पदपथ विकसित केल्यामुळे आणि मेट्रो स्थानकांमुळे अगोदरच रस्ते अरुंद झाले आहेत. त्यात आता महापालिकेने मोरवाडी चौकात वाहतूक बेट उभारण्यास सुरवात केली आहे. त्यासाठी रस्त्यावर ब्लॉक आणि रिफ्लेक्टर लावले असल्याने वाहनास अडथळा निर्माण होत आहे. परिणामी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहे.वाहतूक बेट उभारण्यावर नागरिकांनी हरकत घेतली आहे. वाहतूक पोलिसांनी देखील वाहतूक कोंडी होण्याची भीती व्यक्त केली असून याला विरोध केला आहे, मात्र वाहतूक पोलिसांचा विरोध झुगारून पालिका प्रशासन ते उभारण्यावर ठाम असल्याचे दिसून येते.

> “ पालिकेकडून मोरवाडी चौकात वाहतूक बेट उभारण्यात येणार आहे. प्रायोगिक तत्त्वावर ब्लॉक टाकून वाहतूक नियोजन होते का ? हे तपासण्याचे काम सुरु आहे. आवश्यकतेनुसार त्यामध्ये बदल केले जाणार आहे. नागरिकांना यामुळे कोणताही त्रास होणार याची काळजी घेतली जाईल.
>
> **-मकरंद निकम, मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महापालिका**

# जिल्हा परिषद पदवीधर शिक्षकांची “दिवाळी गोड”!

## Good News: पदवीधर वेतन त्रुटी निवारण लागू करण्याचा निर्णय

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**सध्या देशभरात आठव्या वेतन आयोगाबाबत चर्चा सुरू असतानाच महाराष्ट्र शासनाने एक पाऊल पुढे टाकत सातव्या वेतन आयोगाच्या अंतर्गत येणाऱ्या त्रुटी दूर करण्याचा निर्णय घेतला आहे. याच अंतर्गत राज्य शासनाने पदवीधर वेतन त्रुटी निवारण लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.**



सातव्या वेतन आयोगाच्या सुधारणांनंतर काही पदवीधर शिक्षकांचे वेतन पूर्वीपेक्षा कमी झाल्याचे निदर्शनास आल्याने, शासनाने ही त्रुटी दूर करण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चितीमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे पात्र पदवीधर शिक्षकांना योग्य वेतनश्रेणी लागू होईल आणि त्यांना होणारा आर्थिक अन्याय दूर होणार आहे. यामुळे पदवीधर शिक्षकांची गेल्या वर्षानुवर्षाची मागणी पूर्ण होतानाच त्यांची “दिवाळी गोड” होत आहे, अशा भावना भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या आहेत.

सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू केल्यानंतर, काही पदवीधर शिक्षकांना कमी वेतनवाढ मिळाली होती. यामुळे त्यांच्या वेतनात अन्याय झाल्याची भावना निर्माण झाली होती. ही त्रुटी निवारण व्हावी याकडे विधानसभा अधिवेशनामध्ये आमदार महेश लांडगे यांनी शासनाचे लक्ष वेधले होते. तसेच, महाराष्ट्र राज्य पदवीधर ,प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख संघटनेच्या माध्यमातून या संदर्भात पत्र व्यवहार देखील केला होता. शासनाने ही वेतन निश्चितीमधील त्रुटी दूर करण्यासाठी निर्णय घेतला आहे, जेणेकरून पात्र शिक्षकांना न्याय मिळेल.या निर्णयामुळे पदवीधर शिक्षकांचे वेतन सुधारित वेतनश्रेणीनुसार निश्चित केले जाईल आणि त्यांना जुन्या वेतनापेक्षा कमी वेतन मिळणार नाही.

राज्य शासनाने वेतनत्रुटी समितीच्या अनुशंगाने वित्त विभागाचा शासन निर्णय निर्गमित केला आहे. पण, ग्रामविकास विभागाचा शासन निर्णयाची प्रतिक्षा होती. त्यामुळे जिल्हा परिषद शिक्षकांच्या वेतनत्रुटीत सुधारणा रखडली होती. आता वेतनत्रुटी निवारण समिती 2024 च्या अहवालातील वेतनश्रेणी विषयक व अनुषांगिक शिफारशी लक्षात घेऊन ग्रामविकास विभागाने या संदर्भात आदेश पारित केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या कक्ष अधिकारी दिपाली पवार यांच्या आदेशाने वेतन त्रुटी निवारण लागू करण्याचा निर्णय देण्यात आला आहे. याबाबत राज्यस्तरावर ग्रामविकास विभागाच्या पदवीधर वेतन त्रुटीचा शासन निर्णय निर्गमित झाल्याने जिल्हा परिषद पदवीधर शिक्षकांच्या वेतन त्रुटी बाबतच्या अडचणी दूर होऊन वेतन निश्चिती होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे जिल्हा परिषद पदवीधर शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे, अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र राज्य पदवीधर ,प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख संघटनेचे राज्य सरचिटणीस मनोज मराठे यांनी व्यक्त केली आहे.

> “ सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू केल्यानंतर, काही पदवीधर शिक्षकांना कमी वेतनवाढ मिळाली होती. यामुळे त्यांच्या वेतनात अन्याय झाल्याची भावना निर्माण झाली होती. शासनाने ही वेतन निश्चितीमधील त्रुटी दूर करण्यासाठी निर्णय घेतला आहे. यामुळे पदवीधर शिक्षकांना नक्कीच न्याय मिळाला आहे.  दिवाळीच्या तोंडावर आलेला हा निर्णय दिवाळी गोड करणारा ठरला आहे. याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे आभार व्यक्त करतो.
>
> **-महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# शिक्षण आमच्या हक्काचं!




**१९९१ साली मोहिनी जैन या विद्यार्थिनीची वैद्यकीय शिक्षणाकरिता कर्नाटकमधील सिद्धार्थ मेडिकल कॉलेजमध्ये निवड झाली. त्यासाठीची वार्षिक फी होती ६० हजार रुपये. याशिवाय साडेचार लाख रुपये डोनेशन मागण्यात आले.**

सरकारी जागांच्या कोट्यातून मोहिनी जैन यांची निवड झाली होती, मात्र कर्नाटक सरकारने शिक्षणसंस्थांना शुल्क ठरवण्याचे स्वातंत्र्य देणारी अधिसूचना १९८९ साली जारी केली होती. त्यात मोहिनी जैन ही विद्यार्थिनी उत्तर प्रदेशची आणि या अधिसूचनेने परराज्यातील विद्यार्थ्यांकरिता अधिक फी ठरवली होती. मोहिनीची आर्थिक परिस्थिती बेताची होती. तिला इतके पैसे भरून शिक्षण घेणे अशक्य होते. त्यामुळे या संदर्भात ती न्यायालयात गेली. शिक्षण हा आपला मूलभूत हक्क आहे, असा तिचा युक्तिवाद होता. न्यायालयाने बाजू ऐकून घेतली आणि सांगितले की, शिक्षण हा काही व्यापार नाही. तो कर्तव्याचा आणि सेवेचा भाग आहे. तसेच आत्यंतिक खासगीकरणामुळे शिक्षण घेणेच अशक्य होईल, याचा विचार करून या शुल्कावर नियंत्रण आणण्याचे निर्देश दिले. मूलभूत शिक्षण हा प्रत्येक व्यक्तीचा अधिकार आहे. एकविसाव्या अनुच्छेदामध्ये जगण्याच्या अधिकारामध्ये तो अंतर्भूत आहे, असे सांगणारा न्यायालयाचा निर्णय खूप मोलाचा होता. उन्नीकृष्णन खटल्यात



(१९९३) सर्वोच्च न्यायालयाने शिक्षणाचा हा मूलभूत हक्क प्रत्येक व्यक्तीला असल्याचे सांगितले; मात्र उच्च शिक्षण/व्यावसायिक शिक्षण हा मूलभूत अधिकाराचा भाग नाही, असे सांगितले. त्यामुळे वयाच्या १४ व्या वर्षापर्यंतचे शिक्षण हा मूलभूत हक्क असल्याचे या निर्णयाने अधोरेखित झाले. त्यानंतर २००२ साली ८६ वी घटनादुरुस्ती करून अनुच्छेद २१ मध्ये शिक्षणाचा अधिकार हा मूलभूत अधिकार असल्याचे मान्य केले गेले. या दुरुस्तीनुसार वय ६ ते १४ वर्षे या वयोगटातील प्राथमिक शिक्षण हा मूलभूत हक्क मान्य केला आणि अनुच्छेद २१ (क) मध्ये शिक्षण हक्क सामाविष्ट केला गेला. नंतर २००९ साली भारत सरकारने शिक्षण हक्क कायदा संमत केला आणि त्यानुसार सर्वांपर्यंत शिक्षण पोहोचण्याची दारे किलकिली झाली. मुळात ही घटनादुरुस्ती आणि नंतर कायदा झाला असला तरी त्यासाठीची तरतूद राज्यसंस्थेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये होती. त्यानुसार घटनादुरुस्ती झाली. मात्र यासाठीचा लढा सुरू झाला एकोणिसाव्या शतकात. सावित्रीबाई आणि जोतिबा फुले यांनी शाळा सुरू केल्या. त्यासोबतच सर्वांना शिक्षण मिळावं यासाठीचा आग्रह धरला. १८८२ मध्येच हंटर आयोगासमोर सर्वांना मोफत, समान व सक्तीचे शिक्षण मिळावे यासाठी महात्मा फुलेंनी मागणी केली. ब्रिटिशांनी महात्मा फुलेंना न्याय दिला नसला तरी सयाजीराव गायकवाड आणि राजर्षि शाहू महाराजांनी आपापल्या संस्थानांमध्ये शिक्षण हक्काची अंमलबजावणी केली. काँग्रेसने नेहरू अहवालात, कराची ठरावामध्ये या हक्कासाठीची आग्रही मागणी केली. संविधानसभेतही याबाबत चर्चा झाली. तेव्हा राज्यसंस्थेसाठीच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये त्याचा समावेश केला गेला. स्वातंत्र्यानंतर शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न झाला खरा; पण अधिकृतपणे शिक्षण हक्क मान्य व्हायला खूप उशीर झाला. जगण्याच्या हक्कामध्येच शिक्षणाचा हक्क अंतर्निहित आहे, असे न्यायालय म्हणते तेव्हा त्याचा नेमका अर्थ समजून घेतला पाहिजे. जगण्याला शिक्षणापासून वेगळे करता येत नाही. महात्मा फुले म्हणाले होते: 'सारे अनर्थ अविद्येने झाले आहेत आणि समाजातले परिवर्तन शिक्षणामार्फतच होऊ शकते.' अर्थातच अंधारातून प्रकाशाकडे जायची वाट शिक्षणातून मिळते. हे शिक्षण कोणत्याही सबबीखाली नाकारता येणार नाही. ते आमच्या हक्काचे आहे. संविधानाने शाळेचे प्रवेशद्वार सर्वांसाठी खुले केले. हजारो वर्षांची नाकेबंदी संपली आणि गावकुसाबाहेरच्या वस्तीतली इवलीशी लेक पाटीवर 'ग म भ न' गिरवू लागली. सरकारी जागांच्या कोट्यातून मोहिनी जैन यांची निवड झाली होती, मात्र कर्नाटक सरकारने शिक्षणसंस्थांना शुल्क ठरवण्याचे स्वातंत्र्य देणारी अधिसूचना १९८९ साली जारी केली होती. त्यात मोहिनी जैन ही विद्यार्थिनी उत्तर प्रदेशची आणि या अधिसूचनेने परराज्यातील विद्यार्थ्यांकरिता अधिक फी ठरवली होती.

## प्रासंगिक »

### रक्तदान!

***पॅलेस्टिनींना हक्काच्या भूमीचा काही वाटा तरी देणे, त्यांच्या अस्तित्वाचा हक्क मान्य करणे हाच त्या परिसरात शांतता प्रस्थापित करण्याचा खरा मार्ग आहे...***

गाझा पट्ट्यात इस्रायलकडून सुरू असलेला वंशच्छेद थांबवणे ही मानवतेची गरज होती. ती अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यामुळे का असेना पूर्ण होत असेल तर त्याबाबत समाधान. जगभरातले 'हरी' पॅलेस्टाईनच्या मुद्द्यावर अडलेले असताना गाढवाचे पाय धरण्यामुळे का होईना पण हिंसाचार थांबणार असेल तर त्याचे स्वागत करण्याखेरीज पर्याय नाही. सद्य:स्थितीत ट्रम्प हे अशा नेत्यांचे प्रतिनिधित्व करतात ज्यांना कोणत्याही प्रक्रियेमध्ये काडीचाही रस नसतो. त्यांचे लक्ष असते तत्कालिकता. म्हणजे मथळा व्यवस्थापन. त्या त्या दिवशीच्या वृत्तशीर्षकांची बेगमी झाली त्याबाबत भाष्य आणि भाकीत करण्याआधी हमास आणि इस्रायल यांतील शस्त्रसंधीच्या निमित्ताने आदिम भावभावनांचे जे नग्न, हिडीस प्रदर्शन ट्रम्प आणि इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्याकडून झाले त्यावर टिप्पणी आवश्यक ठरते.

उद्धव ठाकरेंनी स्वत:ला राजकीय एकारलेपणाच्या सर्वोच्च पातळीला का नेले याचा मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार होणे गरजेचे आहे. त्यांच्या सध्याच्या वक्तव्यांमागच्या कारणांचा शोध घेण्यासाठी डॉ. सिग्मंड फ्रॉइड यांनी मांडलेल्या 'बिहेव्हिअर थेरपी' आणि 'कॉग्निटिव्ह थेरपी' या दोन्ही पद्धतींचा आधार घ्यावा लागेल.

# संघाचे फडके देशावर फडकू देणार नाही

स्वतचे वेगळेपण दाखविण्यासाठी त्यांना टोकाच्या वक्तव्यांचा आधार घ्यावा लागत आहे. या स्थितीला आपणच जबाबदार आहोत हे मात्र त्यांचे मन कदापि मान्य करणार नाही...शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचे वैफल्य, अगतिकता आता रायगडाच्या टकमक टोकापर्यंत जाऊन पोहोचली आहे. संघाचे फडके देशावर फडकू देणार नाही, अशा विचार मौक्तिकांद्वारे उद्धवरावांनी आपल्या थोड्याफार राजकीय शहाणपणाचा कडेलोट केला आहे. मोठ्या पराभवाच्या शक्यतेने आणि आपल्या अस्तित्वाच्या भीतीने त्यांची भाषा, एकूणच वर्तन हाराकिरीकडे वाटचाल करत आहे, असे स्पष्टपणे दिसते. पराभवापूर्वीचा हा त्यांचा आकांत ४ जून रोजी आणखी वाढेल. असो! मुद्दा आहे उद्धव ठाकरेंनी स्वत:ला राजकीय एकारलेपणाच्या सर्वोच्च पातळीला का नेले हा. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात ओढून



ताणून आणत उद्धवरावांनी आपले राजकारणातले मडके किती कच्चे आहे हे दाखवून दिलेच. स्वातंत्र्याला ७५ वर्षे होऊन गेल्यावरही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबद्दल नियमित टीका टिप्पणी होत आहे. यातला मुख्य वाटा साम्यवादी, समाजवादी, काँग्रेस विचारसरणीतल्या विचारवंतांचा आणि या विचारसरणीच्या छत्रछायेत राहणाऱ्या पत्रकार, कलावंत मंडळींचा असतो. इंदिरा गांधींनी १९७५ मध्ये आणीबाणीत संघ स्वयंसेवकांना तुरुंगात डांबले, त्याआधी महात्मा गांधींच्या हत्येनंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी आणली गेली होती, १९९२ मध्ये बाबरी मशिदीच्या पतनानंतर पुन्हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घातली गेली. यथावकाश ती उठवली गेली. पण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबाबत काँग्रेस नेतृत्वानेही अशी भाषा कधी वापरली नव्हती. शाही इमाम, सैद शहाबुद्दीन, ओवैसी बंधू आदी नेते मंडळींनीही जी भाषा वापरली नव्हती ती भाषा वापरण्यापर्यंत उद्धव ठाकरे यांची मजल का गेली असावी, या मागच्या कारणांचा शोध राजकीय विश्लेषक वगैरे वर्गातील मंडळी घेतील की नाही ही शंका आहे. कारण हा वर्ग उद्धवरावांवर सध्या तुफान प्रेम करू लागला आहे. भारतीय जनता पार्टी आणि नरेंद्र मोदी, अमित शहा यांच्याबद्दल ताळतंत्र सोडून अद्वातद्वा बोलणारा एखादा नरपुंगव त्यांना हवाच असतो. हाच आपला तारणहार म्हणून ही मंडळी अशा नरपुंगवामध्ये आपली वैचारिक संपत्ती गुंतवतात. उद्धवरावांच्या गेल्या २१-२२ महिन्यांतील वर्तनाचा मानसशास्त्राच्या दृष्टीने शोध घेतला तर त्यांच्या वक्तव्यांमागची अपरिहार्यता कळू शकेल. मानसशास्त्र हा शब्द जाणीवपूर्वक वापरण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

**पीकविमा कंपनीचे पाप**

## पालममध्ये गुन्हा, सदोष वजनी काटे वापरून फसवणूक

# पीकविमा कंपनीचे मापात पाप!

## तहसील कार्यालयात रात्रभर ठिय्या




।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पीक कापणी प्रयोगाच्या आधारे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई आणि पिकविमा मिळू नये यासाठी 'ॲग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी ऑफ इंडियाने' सदोष वजनी काटे वापरून ग्रामस्तरीय विमा समितीची फसवणूक केल्या प्रकरणी तालुका कृषी अधिकारी संतोष भालेराव यांच्या फिर्यादीवरून पालम पोलिसात मंगळवारी (दि. १४) या कंपनीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल व्हावा, या मागणीसाठी शेतकऱ्यांनी पालम तहसील कार्यालयात रात्रभर ठिय्या आंदोलन केले.**

पालम तालुक्यातील खरब धानोरा येथे तालुका कृषी अधिकारी संतोष भालेराव, ॲग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी ऑफ इंडियाचे प्रतिनिधी अनिकेत शेरे (वय ३१) आणि रत्नदीप भालेराव (वय ३४), खराब धानोरा ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी अच्युत भालेराव आणि ग्रामस्तरीय विमा समितीचे सदस्य भास्कर कऱ्हाळे यांच्या उपस्थितीत गट क्रमांक ४४/२ शिवारात ग्रामस्तरीय विमा समितीने खरीप हंगामातील सोयाबीन पीक कापणी प्रयोग केला.

प्रयोगानंतर सोयाबीन धान्याचे ॲग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनीचे प्रतिनिधी अनिकेत शेरे, रत्नदीप भालेराव यांनी वजन केले असता ते ५ किलोग्रॅम एवढे भरले. या वजनावर ग्रामस्तरीय विमा समितीचे सदस्य भास्कर बालासाहेब कऱ्हाळे यांनी आक्षेप घेतल्याने ग्रामविकास अधिकारी अच्युत भालेराव यांनी गावातील किराणा दुकानातील वजन काटा आणून पीक कापणीअंती उपलब्ध झालेल्या सोयाबीनचे वजन केले असता ते ३ किलोग्रॅम इतके भरले. त्यामुळे संबंधित विमा कंपनीने प्रतिनिधींकडे दिलेला वजनी काटा आणि गावातील किराणा दुकानातील वजनी काटा यांच्या वजनात मोठी तफावत असल्याचे दिसून आले. याप्रकरणी संबंधित विमा कंपनीच्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्याची मागणी भास्कर यांनी तालुकास्तरीय विमा समितीकडे केली.यावरून तालुकास्तरीय विमा समितीचे अध्यक्ष तहसीलदार उषाकिरण श्रृंगारे, गटविकास अधिकारी उदयसिंह सिसोदे आणि समितीचे सदस्य सचिव तालुका कृषी अधिकारी संतोष भालेराव यांनी शहानिशा केली असता वजनात वाढ झाल्याचे दिसून आल्याने वजनी मापे निरीक्षक संजय धुमाळ यांनी काट्यांची तांत्रिक तपासणी केली. या तपासणीत तब्बल १ किलो ९७७ ग्रॅम एवढी तफावत आढळून आली. तसा अहवाल वजनी मापे निरीक्षक संजय धुमाळ यांनी तालुकास्तरीय विमा समितीस सादर केला.यावरून ॲग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनीने सदोष वजनी मापाच्या आधारे ग्रामस्तरीय विमा समितीची दिशाभूल केली. शेतकऱ्यांना पिकविमा मिळू नये यासाठी बेकायदेशीर प्रयत्न केला आणि सदोष वजनी मापांच्या आधारे सोयाबीन कापणी प्रयोगातील वजनात वाढ घडवून आणल्या प्रकरणी तालुका कृषी अधिकारी संतोष भालेराव यांच्या फिर्यादीवरून पालम पोलिसांत कंपनीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सरासरी उत्पन्न ठरवण्याच्या पीक कापणी प्रयोगाची प्रक्रिया सुरू असताना वजनमापात खोट केल्याचे उघड झाले. कंपनीच्या प्रतिनिधींना घेऊन शेतकऱ्यांनी पालम पोलीस ठाणे गाठले. गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत पोलीस ठाणे सोडणार नाही, अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली. नंतर शेतकऱ्यांनी त्यांचा मुक्काम तहसील कार्यालयात हलवला. रात्रभर शेतकरी तहसीलमध्येच होते. पीक विमा प्रश्नावर संघर्ष करणारे सुभाष कदम, गोविंद लांडगे, भगवानराव करंजे, मोतीराम शिंदे, दिनाजीराव कराळे आदीसह शेकडो शेतकरी यावेळी उपस्थित होते.

### तहसीलमध्ये रात्रभर ठिय्या

पालम तालुक्यातील खरब धानोरा येथे तालुका कृषी अधिकारी संतोष भालेराव, ॲग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी ऑफ इंडियाचे प्रतिनिधी अनिकेत शेरे (वय ३१) आणि रत्नदीप भालेराव (वय ३४), खराब धानोरा ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी अच्युत भालेराव आणि ग्रामस्तरीय विमा समितीचे सदस्य भास्कर कऱ्हाळे यांच्या उपस्थितीत गट क्रमांक ४४/२ शिवारात ग्रामस्तरीय विमा समितीने खरीप हंगामातील सोयाबीन पीक कापणी प्रयोग केला.

# कर्जमुक्त करण्याची जबाबदारी सरकारची

## सरकारी धोरण यामुळेच शेतकरी कर्जबाजारी झाला : पाटील

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शेतकरी कर्जमुक्त करण्याची जबाबदारी सरकारची आहे. ही जबाबदारी जोपर्यंत सरकार पार पाडत नाही तोपर्यंत आम्ही गप्प बसणार नाही, असा इशारा माजी खासदार संजयकाका पाटील यांनी मंगळवारी तासगावमध्ये दिला.**

विधानसभा निवडणुकीनंतर भाजप की, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात कार्यरत राहणार याची उत्सुकता असताना माजी खासदार पाटील यांनी मंगळवारी चक्काजाम आंदोलनाच्या निमित्ताने सरकारविरोधात रस्त्यावर उतरण्यास प्राधान्य दिले. निसर्गाचा लहरीपणा आणि सरकारी धोरण यामुळेच शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करण्याची सरकारची जबाबदारी आहे. बळीराजाच्या, सामान्य जनतेच्या बाजूने बोलणारा आवाज क्षीण झाला आहे. या जगाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकऱ्यांच्या सर्वसामान्यांच्या प्रश्नाला वाचा फोडल्याशिवाय गप्प बसणार नाही, असा इशारा त्यांनी यावेळी दिला.शेतकरी कर्जमाफी या प्रमुख मुद्द्यासह शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्यांसाठी तासगाव



येथे आयोजित चक्काजाम आंदोलनाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. आपल्या शेळ्या मेंढ्या व पाळीव जनावरासह आलेल्या शेतकऱ्यांनी बसस्थानक चौकात ठिय्या मारला. बैलगाडी, ट्रॅक्टर व जनावरांसह शेतकरी या आंदोलनात सहभागी झाले होते. यामुळे तासगावमधून बाहेर जाणारी व येणारी वाहतूक ठप्प झाली होती. विटा, भिवघाट, भिलवडी, सांगली, मणेराजुरी या मार्गांवर वाहनांच्या चार तासाहून अधिक काळ रांगा लागल्या होत्या.निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांना बाहेर काढायचे असेल तर सरकारने कर्जमाफी करणे हाच त्यावरचा एक मात्र उपाय आहे. आणि त्यासाठी शेतकऱ्याच्या खांद्याला खांदा लावून नव्हे, तर त्याच्यापुढे एक पाऊल राहून लढण्याची भूमिका माजी खासदार पाटील यांनी जाहीर केली. यावेळी युवा नेते प्रभाकर पाटील यांनी शेती परवडत नसताना करावी लागत असल्याचे सांगत शेतकरी पोराला पोरगीही मिळत नसल्याची वेदना व्यक्त केली. निसर्ग कधी बदलतो हेच कळेना झाले आहे.पीक घ्यायचे तर परतफेड करण्यासाठी उत्पन्नाची शाश्वती नाही. यामुळे शेतकरी कर्जाच्या विळख्यात सापडला आहे.

### सरकारनेच पुढाकार घ्यायला हवा

त्याला यातून बाहेर काढण्यासाठी सरकारनेच पुढाकार घ्यायला हवा असेही त्यांनी सांगितले. गेल्या आठवड्यात कार्यकर्त्यांचा संवाद मेळावा घेऊन माजी खासदार पाटील यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काय भूमिका घ्यायची याबाबत चर्चा केली होती.

‘ऑपरेशन सिंदूर’ दहशतवादी हल्ल्यानंतर वरिष्ठ सैन्य अधिकाऱ्याचा खुलासा

# पाकिस्तानचे 100 हून अधिक सैनिक ठार

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तान आणि पाकिस्तान व्याप्त काश्मीरमध्ये ऑपरेशन सिंदूर अंतर्गत कारवाई केली. या प्रत्युत्तरादाखल केलेल्या कारवाईत अनेक दहशतवादी तळ उद्ध्वस्त करण्यात आले.**

## हवाई हद्दीचे वारंवार उल्लंघन



दरम्यान या ऑपरेशनबद्दल आता महत्त्वाची माहिती समोर आली आहे. मे महिन्यात करण्यात आलेल्या या ‘ऑपरेशन सिंदूर’ दरम्यान दहशतवादी तळांना लक्ष्य करताना १०० हून अधिक पाकिस्तानी सैनिक मारले गेले, अशी माहिती डेप्युटी चीफ ऑफ आर्मी स्टाफ (स्टॅटर्जी) लेफ्टनंट जनरल राजीव घई यांनी मंगळवारी दिली आहे. तीन दिवसांच्या या कारवाईदरम्यान लष्करी ऑपरेशन्सचे डायरेक्टर जनरल (DGMO) म्हणून कार्यरत राहिलेले लेफ्टनंट जनरल घई म्हणाले की, त्यांच्या सैन्याने जाहीर केलेल्या नेहमीपेक्षा जास्त मरणोत्तर पुरस्कारांच्या संख्येवरून पाकिस्तानला झालेल्या नुकसानीचा अंदाज लावला जाऊ शकतो, ते यूएन ट्रूप कॉंट्रीब्युटिंग नेशन्सच्या लष्करप्रमुखांच्या परिषदेत बोलत होते.या लष्कराच्या मोहिमेबद्दल आत्तापर्यंत समोर आलेली सर्वात सविस्तर माहिती देताना लेफ्टनंट जनरल घई म्हणाले की, दोन्ही डीजीएमओमध्ये संवाद होऊन देखील पाकिस्तानी ड्रोनकडून भारतीय हवाई हद्दीचे वारंवार उल्लंघन झाल्यामुळे, भारतीय हवाई दलाने (IAF) ९ आणि १० मेच्या रात्री पाकिस्तानमधील अनेक हवाई तळांवर अचूक हल्ले केले.“आम्ही त्यांच्या ११ हवाई तळांना लक्ष्य केले. ८ एअर बेसेस, तीन हँगर्स आणि चार रडारांचे नुकसान झाले. पाकिस्तानी एअर असेट्स जमिनीवर नष्ट करण्यात आले, असे त्यांनी सांगितले. “एक सी-१३० विमान, एक AEW&C, आणि चार ते पाच फायटर जेट्स हवेत नष्ट करण्यात आले,” असेही घई यांनी सांगितले.या महिन्याच्या सुरुवातीला, हवाई दलाचे प्रमुख एअर चीफ मार्शल ए.पी. सिंह यांनी देखील या हवाई हल्ल्यांमध्ये सी-१३० ट्रान्सपोर्ट एअरक्राफ्ट आणि पाकिस्तानी हँगरमध्ये उभी करण्यात आलेली, बहुतेक एफ-१६ प्रकारची चार ते पाच लढाऊ विमानांचे नुकसानग्रस्त झाल्याची पुष्टी केली होती. तसेच, एक एअरबोर्न अर्ली वॉर्निंग अँड कंट्रोल (AEW&C) किंवा सिग्नल्स इंटेलिजन्स (SIGINT) एअरक्राफ्ट नष्ट करण्यात आले. याबरोबरच एफ-१६ आणि जेएफ-१७ क्लासची अनेक प्रगत लढाऊ विमाने नष्ट झाली होती, असेही त्यांनी सांगितले होते. “अरबी समुद्रात भारतीय नौदलालाही हाय अलर्टवर ठेवण्यात आले होते. “जर शत्रूने हे वाढवण्याचा निर्णय घेतला असता, तर फक्त समुद्रातूनच नव्हे, तर त्यांच्यासाठी ते इतरही बाजूंनी विनाशकारी ठरले असते,” असे घई म्हणाले.” ऑपरेशन सिंदूरमध्ये ७ मे रोजी पहाटे करण्यात आलेल्या हल्ल्यात १०० हून अधिक दहशतवादी ठार झाले असेही घई म्हणाले. दरम्यान या ऑपरेशनबद्दल आता महत्त्वाची माहिती समोर आली आहे. मे महिन्यात करण्यात आलेल्या या ‘ऑपरेशन सिंदूर’ दरम्यान दहशतवादी तळांना लक्ष्य करताना १०० हून अधिक पाकिस्तानी सैनिक मारले गेले, अशी माहिती डेप्युटी चीफ ऑफ आर्मी स्टाफ (स्टॅटर्जी) लेफ्टनंट जनरल राजीव घई यांनी मंगळवारी दिली आहे. तीन दिवसांच्या या कारवाईदरम्यान लष्करी ऑपरेशन्सचे डायरेक्टर जनरल (DGMO) म्हणून कार्यरत राहिलेले लेफ्टनंट जनरल घई म्हणाले की, त्यांच्या सैन्याने जाहीर केलेल्या नेहमीपेक्षा जास्त मरणोत्तर पुरस्कारांच्या संख्येवरून पाकिस्तानला झालेल्या नुकसानीचा अंदाज लावला जाऊ शकतो, ते यूएन ट्रूप कॉंट्रीब्युटिंग नेशन्सच्या लष्करप्रमुखांच्या परिषदेत बोलत होते.या लष्कराच्या मोहिमेबद्दल आत्तापर्यंत समोर आलेली सर्वात सविस्तर माहिती देताना लेफ्टनंट जनरल घई म्हणाले की, दोन्ही डीजीएमओमध्ये संवाद होऊन देखील पाकिस्तानी ड्रोनकडून भारतीय हवाई हद्दीचे वारंवार उल्लंघन झाल्यामुळे, भारतीय हवाई दलाने (IAF) ९ आणि १० मेच्या रात्री पाकिस्तानमधील अनेक हवाई तळांवर अचूक हल्ले केले.“आम्ही त्यांच्या ११ हवाई तळांना लक्ष्य केले.

## पाच लढाऊ विमानांचे नुकसान

पाकिस्तानी एअर असेट्स जमिनीवर नष्ट करण्यात आले, असे त्यांनी सांगितले. “एक सी-१३० विमान, एक AEW&C, आणि चार ते पाच फायटर जेट्स हवेत नष्ट करण्यात आया महिन्याच्या सुरुवातीला, हवाई दलाचे प्रमुख एअर चीफ मार्शल ए.पी. सिंह यांनी देखील या हवाई हल्ल्यांमध्ये सी-१३० ट्रान्सपोर्ट एअरक्राफ्ट आणि पाकिस्तानी हँगरमध्ये उभी करण्यात आलेली, बहुतेक एफ-१६ प्रकारची चार ते पाच लढाऊ विमानांचे नुकसानग्रस्त झाल्याची पुष्टी केली होती.

# जबाबदार अधिकाऱ्यांना अटक करा!

## राहुल गांधी आत्महत्या केलेल्या कुमार यांच्या कुटुंबीयांच्या भेटीला

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**हरियाणाचे वरिष्ठ आयपीएस अधिकारी वाय पुरन कुमार यांच्या आत्महत्येला जबाबदार अधिकाऱ्यांना अटक करा, अशी मागणी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मंगळवारी केली. राहुल यांनी चंडीगडमध्ये कुमार यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. कुमार यांच्या मृत्यूप्रकरणी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री नायब सिंह सैनी यांनी तातडीने कारवाई करावी अशी मागणी राहुल यांनी एक्सवर लिहिलेल्या पोस्टमध्ये केली.**



वाय पुरन कुमार हे ७ ऑक्टोबरला त्यांच्या निवासस्थानी मृतावस्थेत आढळले होते. त्यांची पत्नी अमनीत पी कुमार या आयएएस अधिकारी असून हरियाणाच्या परदेशी सहकार्य विभागाच्या आयुक्त आणि सचिव आहेत. ७ ऑक्टोबरला त्या मुख्यमंत्री सैनी यांच्या शिष्टमंडळाबरोबर जपानच्या दौऱ्यावर गेल्या होत्या.कुमार कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर, पत्रकारांशी बोलताना राहुल गांधी यांनी आरोप केला की, याप्रकरणी मुक्त आणि निष्पक्ष चौकशी होईल आणि कारवाई केली असे आश्वासन खुद्द मुख्यमंत्र्यांनी कुटुंबाला दिले होते.

मात्र, त्यांनी त्याचे पालन केले नाही.हा गेल्या १० किंवा १५ दिवसांतील प्रश्न नाही. राहुल गांधी यांच्या भेटीपूर्वी राज्य सरकारने सोमवारी रात्री उशिरा राज्याचे पोलीस महासंचालक शत्रुजीत कपूर यांना रजेवर पाठवले. त्यापूर्वी रोहतकचे पोलीस अधीक्षक नरेंद्र बिजरनिया यांची बदली करण्यात आली. पुरन यांनी आत्महत्या करण्यापूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीमध्ये आठ वरिष्ठ अधिकाऱ्यांची नावे लिहिली होती.

## पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई

त्यामध्ये या दोघांचा समावेश होता. या अधिकाऱ्यांनी आपल्याविरोधात जातीच्या आधारे भेदभाव, जाणीवपूर्वक मानसिक छळ, जाहीर अपमान आणि छळ केल्याचे पुरन यांनी चिठ्ठीमध्ये नमूद केले होते.रोहतक जिल्ह्यातील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संदीप कुमार यांनी मंगळवारी स्वतःवर बंदुकीच्या गोळ्या झाडून आत्महत्या केली. त्यापूर्वी त्यांनी कथितरित्या एक सहा मिनिटांची ध्वनिचित्रफित आणि तीन पानी चिठ्ठी ठेवली.

# सुमीत पुसावळेचं कुटुंबीयांसह सेलिब्रेशन

‘स्टार प्रवाह’ वाहिनीवर लवकरच ‘घरोघरी मातीच्या चुली’ ही नवी मलिका सुरू होणार आहे. अभिनेत्री रेश्मा शिंदे, सविता प्रभुणे, प्रमोद पवार, उदय नेने, आरोही सांबरे अभिनीत ही मालिका १८ मार्चपासून संध्याकाळी ७.३० वाजता पाहायला मिळणार आहे. या मालिकेत हृषिकेश या प्रमुख भूमिकेसाठी अभिनेता सुमीत पुसावळेची वर्णी लागली आहे. याआधी सुमीत ‘बाळूमामाच्या नावानं चांगभलं’ या मालिकेत झळकला होता. पण आता मालिकेतून त्याने एक्झिट घेत तो नव्या रुपात भेटीस येणार आहे. अलीकडेच अभिनेता सुमीत पुसावळे ‘घरोघरी मातीत चुली’ या मालिकेत झळकणार असल्याचं जाहीर झालं. तेव्हापासून तो चर्चेत आला आहे. सुमीतने या नव्या प्रवासानिमित्ताने कुटुंबियांबरोबर सेलिब्रेशन केलं. याचा व्हिडीओ अभिनेत्याची बायको मोनिका पुसावळेने इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. याशिवाय मोनिकाने सुमीतसाठी इन्स्टाग्राम स्टोरीवरही खास पोस्ट लिहिल्या होत्या.‘बाळूमामांच्या नावानं चांगभलं’ या मालिकेतील सुमीतचा प्रवास संपल्याच्यानिमित्ताने मोनिकाचे काही फोटो शेअर करत पोस्ट लिहिली. मोनिकाने लिहिलं की, सुमीत तुझ्या कामाबद्दलचं प्रेम, निष्ठा, मामांवरचं प्रेम, विश्वास हे सगळं मी खूप जवळून अनुभवलं आहे. तू मामांचं कार्य घराघरात पोहोचवलं. उन्ह असो, पाऊस असो कधी तू आणि तुझी टीम थांबली नाही. मला आज बायको म्हणून खूप अभिमान वाटतोय. तुला प्रत्येकाने जे प्रेम दिलं आहे ते असंच कायम राहो आणि तुझ्या मनातल्या सर्व इच्छा पूर्ण व्हावी हिच मामांच्या चरणी प्रार्थना.

# ‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ पोहोचली ऑस्ट्रेलियात!

‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ हा कार्यक्रम घराघरांत लोकप्रिय आहे. यामधील प्रत्येक विनोदवीर प्रेक्षकांना आपलासा वाटतो. हास्यजत्रेमुळे अनेक नवोदित कलाकारांना एक वेगळी ओळख मिळाली. परदेशातील प्रेक्षकांना सुद्धा या कार्यक्रमाची तुफान क्रेझ आहे. त्यामुळे हास्यजत्रेची टीम अनेकदा परदेश दौऱ्यावर जाऊन तेथील प्रेक्षकांचं मनोरंजन करत असते. गेल्यावर्षी ही संपूर्ण टीम अमेरिका दौऱ्यावर गेली होती. आता यंदाच्या वर्षी महाराष्ट्राला खळखळून हसवणारे हे विनोदवीर ऑस्ट्रेलियात पोहोचले आहेत. ‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ची संपूर्ण टीम ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर गेली असून याठिकाणी सिडनी, मेलबर्न अशा महत्त्वाच्या शहरांमध्ये हे कलाकार लाइव्ह परफॉर्म करणार आहेत. विनोदवीरांसह या कार्यक्रमाची सूत्रसंचालिका अभिनेत्री प्राजक्ता माळी देखील ऑस्ट्रेलियात पोहोचली आहे. याठिकाणी या संपूर्ण टीमने मिळून एका ट्रेंडिंग गाण्यावर जबरदस्त डान्स केला. याचा खास व्हिडीओ प्राजक्ताने इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे.ऑस्ट्रेलियाच्या समुद्रकिनारी प्राजक्तासह पृथ्वीक प्रताप, सचिन मोटे, समीर चौघुले, नम्रता संभेराव, वनिता खरात, प्रसाद खांडेकर, ओंकार राऊत, चेतना भट या सगळ्या कलाकारांनी मिळून “कुडिये नी...” या लोकप्रिय गाण्यावर डान्स केला.“आम्ही ऑस्ट्रेलियात एकत्र अशी मजा करतोय... सचिन मोटे सर सुद्धा सामील झाले, याचा विशेष आनंद!” असं कॅप्शन प्राजक्ता माळीने या व्हिडीओला दिलं आहे.

# साराची सर्वोत्कृष्ट भूमिका?

सारा अली खान नावाच्या अभिनेत्रीची आजवरची सर्वोत्कृष्ट भूमिका म्हणून तिच्या ए वतन मेरे वतन नावाच्या चित्रपटाचे नाव सांगावे लागेल. अशा प्रकारच्या प्रतिक्रिया सोशल (AE WATAN MERE WATAN TRAILER NEWS) मीडियावर नेटकऱ्यांकडून येत आहेत. त्याला कारण या चित्रपटाचा व्हायरल झालेला ट्रेलर. बऱ्याच दिवसांपासून या चित्रपटाच्या ट्रेलरची चर्चा रंगली आहे. गेल्या वर्षी सारानं तिच्या चित्रपटांनं नेटकऱ्यांचे, चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले होते. तिचा विकी कौशल सोबत प्रदर्शित झालेला चित्रपटही चर्चेचा (SARA ALI KHAN VIRAL NEWS) विषय होता. या सगळ्यात ॲमेझॉन प्राईमवर प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटातून साराचा एक वेगळाच अंदाज दिसून येतो. भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीचा तो काळ. इंग्रजांची ती जुलमी राजवट मोडून काढण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीनं मोहिमा सुरु होत्या. त्यातील एका मोहिमेचं प्रतिनिधीत्व सारा अली खान करते आहे.मेरे वतन हा अशा एका महिलेची कथा सांगतो जिनं तिच्या धाडसीपणानं देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात महत्वाची भूमिका साकारली आहे. या चित्रपटामध्ये सारानं उषा नावाच्या मुलीची भूमिका वठवली असून त्यात तिचा स्वातंत्र्याप्रतीचा संघर्ष दिसून आला आहे. १९४२ साली भारत छोडो जे आंदोलन छेडले गेले त्यात भूमीगत राहून रेडिओ स्टेशन चालवण्याचे काम उषानं केलं होतं. ते हे या चित्रपटातून दिसून येते. ट्रेलरच्या सुरुवातीला दिसते की, सारा अली खान ही हातात तिरंगा घेतलेली दिसते.



# अरेंज मॅरेजमधून उलगडणार लव्ह स्टोरी

लोकप्रिय मराठमोळी अभिनेत्री शिवानी सुर्वे नेहमीच चर्चेत असते. ‘देवयानी’ या मालिकेतून शिवानी घराघरांत पोहचली. काही महिन्यांपूर्वीच तिचा झिम्मा २ चित्रपट प्रदर्शित झाला. प्रेक्षकांकडून या चित्रपटाला भरभरून प्रतिसादम मिळाला होता. मराठीबरोबर शिवानीने हिंदी मालिकांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. आता लवकरच शिवानी ‘ऊन सावली’ चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात तिच्याबरोबर भूषण प्रधानची प्रमुख भूमिका आहे. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला. ‘ऊन सावली’ हा चित्रपट प्रणय आणि आन्वीची प्रेमकथा आहे. ‘एक अरेन्ज मॅरेज ही अद्भुत लव स्टोरी असू शकते’ ह्या वाक्यात ‘ऊन सावलीचे’ गूढ लपलेले आहे. एकमेकांच्या डोळ्यात डोळे घालून पाहणारे हे सुंदर जोडपं बरच काही सांगू पाहत आहे, बरच काही बोलू इच्छित आहेत. पहिल्या भेटीतच प्रणयला आन्वी आवडते. परंतु आन्वीचा विरोध हा कायम आहे. तिच्या मनात तर वेगळाच गोंधळ चालू आहे. हा चित्रपट लग्न करणाऱ्या प्रत्येक व्यक्तिला स्वतःशी जोडणारा आहे.तिकीट विंडो पिक्चर्स बॅनरअंतर्गत समीर ए शेखद्वारा या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. सार्थक नकुल यांनी या चित्रपटाला संगीत दिले आहे. या चित्रपटात भूषण व शिवानीबरोबर अजिंक्य ननावरे, राज सरनागत, अंकिता भोईर, विकास हांडे, श्वेता कामत, प्रिया तुळजापूरकर आणि मनाली निकम यांच्या प्रमुख भूमिका आहेत. येत्या १५ मार्चला हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.लोकप्रिय मराठमोळी अभिनेत्री शिवानी सुर्वे नेहमीच चर्चेत असते. ‘देवयानी’ या मालिकेतून शिवानी घराघरांत पोहचली. काही महिन्यांपूर्वीच तिचा झिम्मा २ चित्रपट प्रदर्शित झाला. प्रेक्षकांकडून या चित्रपटाला भरभरून प्रतिसादम मिळाला होता. मराठीबरोबर शिवानीने हिंदी मालिकांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. आता लवकरच शिवानी ‘ऊन सावली’ चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात तिच्याबरोबर भूषण प्रधानची प्रमुख भूमिका आहे. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला. ‘ऊन सावली’ हा चित्रपट प्रणय आणि आन्वीची प्रेमकथा आहे. ‘एक अरेन्ज मॅरेज ही अद्भुत लव स्टोरी असू शकते’ ह्या वाक्यात ‘ऊन सावलीचे’ गूढ लपलेले आहे. एकमेकांच्या डोळ्यात डोळे घालून पाहणारे हे सुंदर जोडपं बरच काही सांगू पाहत आहे, बरच काही बोलू इच्छित आहेत.

# माझ्या सर्व चाहत्यांचे खूप आभार मानते

मनिषा राणी ही आता झलक दिखला जा च्या अकराव्या सीझनची विजेती झाली आहे. त्यानंतर तिची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. गेल्या काही दिवसांपासून तिच्या नावाची जोरदार चर्चा होती. अखेर तिच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. सोशल मीडियावर एक दिवस अगोदरच मनिषाचं नाव विजयी म्हणून समोर आले होते. टीव्ही मनोरंजन क्षेत्रात गेल्या काही वर्षांपासून सुरु असणाऱ्या रियॅलिटी शो मध्ये झलक दिखला जा चे नाव घेता येईल. या रियॅलिटी शो चा अकरावा सीझन पार पडला असून त्यातील सहभागी स्पर्धकांविषयी चाहत्यांना कमालीची उत्सुकता असल्याचे दिसून आले आहे. अशातच मनिषा राणीनं विजेतेपद मिळवल्यानंतर तिनं दिलेल्या प्रतिक्रियेनं नेटकऱ्यांच्या चर्चेला उधाण आले आहे. सोशल मीडियावर मनिषाच्या नावाची चर्चा आहे. ती विजयी होताच तिच्याव चाहत्यांनी, नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. या सगळ्यात मनिषाची प्रतिक्रिया देखील चर्चेत आली आहे. ती नेमकी काय म्हणाली हेही आपण जाणून घेऊयात. मनिषाला झलक दिखला जा चे विजेतेपद मिळवल्यानंतर तिला ३० लाख रुपयांचे बक्षीस देण्यात आले. त्यानंतर तिनं इंस्टावरुन चाहत्यांचे आभार मानले आहेत. तिनं म्हटलं आहे की, मी माझ्या सर्व चाहत्यांचे खूप आभार मानते. त्यांच्या मुळेच हा प्रवास शक्य झाला. त्यांनी केलेल्या सहकार्याविषयी मी त्यांची आभारी आहे.त्या व्हिडिओच्या शेवटी ती म्हणते की, मी आता जे काही पाहते आहे ते सगळं खरं आहे यावर माझा विश्वासच बसत नाही. माझ्यासाठी एक ते दीड लाख वोटिंग एका दिवसांत आली. मला एवढं प्रेम मिळालं हेच माझ्यासाठी खूप आहे. लोकांनी मला जे खूप सहकार्य केले त्यासाठी त्यांना धन्यवाद. अशा शब्दांत मनीषा राणीनं तिच्या भावना व्यक्त केल्या आहेत.टीव्ही मनोरंजन विश्वातील प्रसिद्ध रियॅलिटी शो झलक दिखला जा च्या अकराव्या सीझनचा ग्रँड सीझन नुकताच पार पडला.त्याला बॉलीवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री हुमा कुरेशी हजर होती. यावेळी बिग बॉसच्या १७ व्या सीझनचा विजेता मुनव्वर देखील उपस्थित होता. या सगळ्यात एका व्हिडिओनं नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. मनीषा रानीनं यंदाच्या झलक दिखजा चे विजेतेपद मिळवून आपल्या नावाची वेगळी ओळख निर्माण केली आहे. बऱ्याच दिवसांपासून झलक दिखला जा ची चर्चा होती. अखेर त्याचा यंदाचा सीझन संपला असून त्यानं चाहत्यांचा निरोप घेतला आहे. या सगळ्यात शेवटच्या एपिसोडमध्ये चर्चा रंगली होती ती हुमा कुरेशी आणि मुनव्वर फारुखीची. त्यानं तिची टिंगल केल्याचे दिसून आले आहे.



**इंडिजचा पराभव**

## इतिहासात अशी कामगिरी करणारा पहिला संघ

# टीम इंडियाची वर्ल्ड रेकॉर्डशी बरोबरी

## भारतीय संघाची ऐतिहासिक कामगिरी

## जागतिक विक्रमाची बरोबरी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघाने वेस्ट इंडिजविरूद्धचा आपला विक्रम कायम ठेवत कसोटी मालिका २-०च्या फरकाने आपल्या नावे केली आहे. भारताच्या निर्भेळ मालिका विजयासह संघाने विश्वविक्रमाची बरोबरी करत मोठी कामगिरी नोंदवली आहे. दिल्ली कसोटीत भारताने वेस्ट इंडिजविरूद्ध ७ विकेट्सने विजय मिळवला. या सामन्यात टीम इंडिया मोठ्या विजयाच्या जवळ होती, पण वेस्ट इंडिजने कमालीची झुंज दिली, पण भारताने अखेर विजय मिळवला.**




वेस्ट इंडिज संघाविरूद्ध विजयासह टीम इंडियाने कसोटी क्रिकेटच्या इतिहासात अशी कामगिरी केली आहे, जी यापूर्वी फक्त एकदाच घडली आहे. यासह भारताने जागतिक विक्रमाची बरोबरी केली आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या चक्रातील भारताने चौथा कसोटी सामना जिंकला आहे. यासह संघ गुणतालिकेत तिसऱ्या स्थानी आहे.शुबमन गिलच्या नेतृत्वाखाली भारतीय क्रिकेट संघाने पहिली कसोटी मालिका जिंकली आहे. भारताने गिलच्या नेतृत्वाखाली इंग्लंड दौऱ्यावरही चांगली कामगिरी केली होती, पण ती कसोटी मालिका अनिर्णित राहिली. २००२ पासून टीम इंडियाने वेस्ट इंडिजविरूद्ध एकही कसोटी मालिका गमावलेली नाही. हा एक मोठा विक्रम आहे. एका संघाविरूद्ध सर्वाधिक कसोटी मालिका जिंकण्याचा विक्रम टीम इंडियाने आपल्या नावे केला आहे. यापूर्वी एका संघाविरूद्ध सर्वाधिक कसोटी मालिका जिंकण्याचा विक्रम दक्षिण आफ्रिकेच्या नावावर होता. १९९८ ते २०२५ पर्यंत दक्षिण आफ्रिकेने सलग १० मालिकांमध्ये वेस्ट इंडिजचा पराभव केला. तर भारताने आता सलग १० कसोटी मालिकांमध्ये वेस्ट इंडिजचा पराभव करून दक्षिण आफ्रिकेच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे. पण यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे दक्षिण आफ्रिकेने वेस्ट इंडिजविरूद्ध दोन सामने गमावले आहेत. तर भारताने एकही सामना न गमावता मालिका आपल्या नावे केली आहे.२००२ पासून भारताने वेस्ट इंडिजविरूद्ध एकही कसोटी सामना गमावलेला नाही. भारताने १७ सामने जिंकल्या तर १० कसोटी सामने अनिर्णित राहिले. एखाद्या संघाविरूद्ध कसोटीत भारताचा हा सर्वात मोठा विक्रम आहे.वेस्ट इंडिज संघाविरूद्ध विजयासह टीम इंडियाने कसोटी क्रिकेटच्या इतिहासात अशी कामगिरी केली आहे, जी यापूर्वी फक्त एकदाच घडली आहे. यासह भारताने जागतिक विक्रमाची बरोबरी केली आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या चक्रातील भारताने चौथा कसोटी सामना जिंकला आहे. यासह संघ गुणतालिकेत तिसऱ्या स्थानी आहे.शुबमन गिलच्या नेतृत्वाखाली भारतीय क्रिकेट

या सामन्यात टीम इंडिया मोठ्या विजयाच्या जवळ होती, पण वेस्ट इंडिजने कमालीची झुंज दिली, पण भारताने अखेर विजय मिळवला. वेस्ट इंडिज संघाविरूद्ध विजयासह टीम इंडियाने कसोटी क्रिकेटच्या इतिहासात अशी कामगिरी केली आहे, जी यापूर्वी फक्त एकदाच घडली आहे. यासह भारताने जागतिक विक्रमाची बरोबरी केली आहे.

संघाने पहिली कसोटी मालिका जिंकली आहे. भारताने गिलच्या नेतृत्वाखाली इंग्लंड दौऱ्यावरही चांगली कामगिरी केली होती, पण ती कसोटी मालिका अनिर्णित राहिली. २००२ पासून टीम इंडियाने वेस्ट इंडिजविरूद्ध एकही कसोटी मालिका गमावलेली नाही. हा एक मोठा विक्रम आहे. एका संघाविरूद्ध सर्वाधिक कसोटी मालिका जिंकण्याचा विक्रम टीम इंडियाने आपल्या नावे केला आहे. यापूर्वी एका संघाविरूद्ध सर्वाधिक कसोटी मालिका जिंकण्याचा विक्रम दक्षिण आफ्रिकेच्या नावावर होता. १९९८ ते २०२५ पर्यंत दक्षिण आफ्रिकेने सलग १० मालिकांमध्ये वेस्ट इंडिजचा पराभव केला. तर भारताने आता सलग १० कसोटी मालिकांमध्ये वेस्ट इंडिजचा पराभव करून दक्षिण आफ्रिकेच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे. पण यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे दक्षिण आफ्रिकेने वेस्ट इंडिजविरूद्ध दोन सामने गमावले आहेत. तर भारताने एकही सामना न गमावता मालिका आपल्या नावे केली आहे.२००२ पासून भारताने वेस्ट इंडिजविरूद्ध एकही कसोटी सामना गमावलेला नाही. भारताने १७ सामने जिंकल्या तर १० कसोटी सामने अनिर्णित राहिले. एखाद्या संघाविरूद्ध कसोटीत भारताचा हा सर्वात मोठा विक्रम आहे.रूद्धचा आपला विक्रम कायम ठेवत कसोटी मालिका २-०च्या फरकाने आपल्या नावे केली आहे. भारताच्या निर्भेळ मालिका विजयासह संघाने विश्वविक्रमाची बरोबरी करत मोठी कामगिरी नोंदवली आहे. दिल्ली कसोटीत भारताने वेस्ट इंडिजविरूद्ध ७ विकेट्सने विजय मिळवला.

# धोनी, रोहित, कोहलीची परंपरा कायम!

## कर्णधार गिलने मालिका विजयाची ट्रॉफी जिंकताच पाहा काय केलं?

## कुलदीप यादव सामनावीर

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय क्रिकेट संघाने घरच्या मैदानावर वेस्ट इंडिजविरूद्ध २-० असा एकतर्फी मालिका विजय मिळवला. दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या या दुसऱ्या कसोटी सामन्यात टीम इंडियाने ७ विकेट्सने विजय मिळवला. नवा कसोटी कर्णधार शुबमन गिलच्या नेतृत्वाखाली हा टीम इंडियाचा पहिला मालिका विजय आहे. या मालिका विजयाची ट्रॉफी स्वीकारल्यानंतर गिलने टीम इंडियाची परंपरा कायम ठेवली आहे.**



गिलने एमएस धोनी, विराट कोहली आणि रोहित शर्मा यांची परंपरा पुढे कायम सुरू ठेवली. या तिघांनीही भारताच्या मालिका विजयानंतर कायम ट्रॉफीही संघातील युवा खेळाडूच्या हाती दिली आहे. गिलने जगदीशनला ट्रॉफी दिल्यानंतर संघाने विजयाचा आनंद साजरा केली. याचा व्हीडिओही व्हायरल होत आहे.भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात खेळल्या गेलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात फॉलोऑन दिलेल्या वेस्ट इंडिजचा दुसरा डाव ३९० धावांवर आटोपला

जिथे त्याने ही ट्रॉफी संघातील युवा खेळाडू एन जगदीशन याच्याकडे सुपूर्द केली. एन जगदीशनला भले या मालिकेत खेळण्याची संधी मिळाली नाही, पण तो संघातील नवा खेळाडू होता.दुसऱ्या कसोटी सामन्याचा सामनावीर कुलदीप यादव ठरला, ज्याने या सामन्यात एकूण ८ विकेट्स घेतले. तर मालिकावीरचा पुरस्कार रवींद्र जडेजाला देण्यात आला.

आणि भारताला विजयासाठी १२१ धावांचे लक्ष्य मिळाले. जे भारताने सहज गाठत वेस्ट इंडिजविरूद्ध मालिका विजयाचा रेकॉर्ड कायम ठेवला आहे.दुसऱ्या कसोटीच्या अखेरच्या दिवशी टीम इंडियाने केवळ तीन विकेट्स गमावून विजय मिळवला.तर अहमदाबाद कसोटीत टीम इंडियाने वेस्ट इंडिजचा एक डाव आणि १४० धावांनी पराभव केला होता आणि मालिकेत आघाडी मिळवली.कर्णधार शुबमन गिलला भारताच्या मालिका विजयानंतर बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी ट्रॉफी दिली. गिलने ट्रॉफी स्वीकारल्यानंतर तो संघाजवळ

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। बुधवार।

। दि. 15 ऑक्टोबर 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## पूरग्रस्तांचे संसार सावरण्यासाठी

# पिंपरी चिंचवडची रणरागिनी मदतीला!

### माढा तालुक्यातील पूरग्रस्तांसाठी कविता भोंगाळे-पाटील यांच्याकडून मदतीचा हात

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**माढा तालुक्यात अलीकडेच आलेल्या पुरामुळे अनेक कुटुंबांचे मोठे नुकसान झाले. या आपत्तीग्रस्त कुटुंबांना दिलासा देण्यासाठी भोसरीचे आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा पिंपरी-चिंचवड जिल्हा चिटणीस कविता भोंगाळे-पाटील यांनी पुढाकार घेत संसार उपयोगी साहित्याचे वाटप केले...**



या उपक्रमांतर्गत माढा तालुक्यातील कुंभेज, केवड, खैराव आणि उंदरगाव येथील पूरग्रस्तांना अन्नधान्य, चादरी, कपडे, शालेय साहित्य आणि इतर आवश्यक वस्तूंचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन संबंधित गावांच्या ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य आणि ग्रामसेवक यांच्या वतीने करण्यात आले होते.

कार्यक्रमात बोलताना कविता भोंगाळे-पाटील म्हणाल्या, "आपत्तीच्या काळात समाजातील प्रत्येकाने एकमेकांना आधार देणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. अशा प्रकारच्या मदतीमुळे पूरग्रस्त कुटुंबांना मानसिक आणि भौतिक बळ मिळते."

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विदर्भ मित्र मंडळ, भोसरी यांच्या वतीने ५१ हजार रुपये किमतीचे शंभर धान्य किट पूरग्रस्तांना वाटपासाठी देण्यात आले. यासोबतच भाजपा पदाधिकारी, महिला बचत गट आणि प्रभाग क्रमांक पाचमधील नागरिकांनी सढळ हाताने जीवनावश्यक वस्तू, धान्य आणि शालेय साहित्य प्रदान केले. कविता भोंगाळे-पाटील यांनी या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले.\

कार्यक्रमावेळी विदर्भ मित्र मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, पदाधिकारी, सभासद तसेच संबंधित गावांचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, स्वयंसेवक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी गावकऱ्यांनी आयोजकांचे तसेच आमदार महेश लांडगे यांचे आभार मानले आणि अशा उपक्रमांमुळे समाजात ऐक्य आणि माणुसकीचा संदेश पसरतो, असे मत व्यक्त केले.

यावेळी कुंभोज ग्रामपंचायतचे मदन अलदर (उपसरपंच), धूळा दादा भिसे (पोलिस पाटील), नवनाथ नागटिळक, रमेश सरवदे, संजय हरदडे आणि इतर ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ, खैराव, माढा (सोलापूर) सरपंच जानकाबाई म्हस्के, उपसरपंच पंडित वसंतराव पाटील, ग्रामपंचायत सदस्य रामेश्वर नागटिळक, प्रतापराव पाटील, प्रशांत नागटिळक केवड ग्रामपंचायतचे उपस्थित सदस्य राजेंद्र पाटील (सरपंच), प्रशांत लटके तसेच उंदरगाव ग्रामपंचायतचे उपस्थित सदस्य सरपंच राजाभाऊ लवटे, अतुल म्हस्के, मगन नाईकवाडे, रामचंद्र थोरात, सतीश आरे, किरण लवटे, आदित्य लावते, संदीप चव्हाण आदी उपस्थित होते.

## ऋषिकेश चिकणे याला "डिस्कस थ्रो"मध्ये रौप्य पदक

### शिक्षण विश्व : डॉ. डी. वाय. पाटील कॉलेजकडून कौतुक

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, आळंदी (डीवायपीसीओई) महाविद्यालय विद्यार्थी ऋषिकेश चिकणे (ईएनटीसी विभाग) याने नुकत्याच झालेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे आयोजित एसपीपीयू आंतरमहाविद्यालयीन ॲथलेटिक्स स्पर्धेत डिस्कस थ्रो प्रकारात रौप्य पदक पटकावून महाविद्यालयाचा गौरव वाढवला.**

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल ट्रस्टी तेजस पाटील, कॅम्पस डायरेक्टर रिअर ॲडमिरल अमित विक्रम (निवृत्त), प्राचार्य पी मालाथी आणि क्रीडाशिक्षण संचालक अबाजी माने यांनी ऋषिकेशचे विशेष अभिनंदन केले असून त्याच्या कष्ट, समर्पण आणि उत्तम खेळगतीचा प्रत्यय या यशातून स्पष्टपणे दिसून येतो. ऋषिकेशने दाखवलेली चिकाटी आणि मेहनत आज त्याच्या या मोठ्या यशामागे आहे. असे महाविद्यालयाने म्हटले आहे.



# महाईन्यूज

ePaper

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

। बुधवार।

। दि. 15 ऑक्टोबर 2025।



www.rklgis.org

RKL GALAXY International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution

RKL Galaxy International School

EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING

# Admission Open

FOR 2026 – 27

Nursery – Std X

- **CBSE** Curriculum
- **Separate Sports Teachers** for Indoor & Outdoor Sports
- Digital Classrooms with **AV Facilities**
- **Skill Development Programs** including:
  Robotics
  Dance, Music, Speech & Drama
  Entrepreneurship
- Focus on **Holistic Development**



**Enroll Now!**

Sunday Open: From 10 AM to 1 PM

**Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!**

8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune

## गांधीनगर, खराळवाडी परिसरातील दीडशे गरजू महिलांची दिवाळी गोड होणार

# गरजू महिलांना दिवाळी शिधावाटप!

## प्रतिभा नारी महिला बचत गट, सुदर्शन स्पोर्ट्स क्लबचा पुढाकार




। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

पिंपरी येथील गांधीनगर, खराळवाडी परिसरातील दीडशे गरजू महिलांना दिवाळी सण आनंदात व उत्साहात साजरा करता यावा यासाठी साखर, तेल, मैदा , रवा डाळीचे पीठ असलेले १५० किटचे वाटप प्रतिभा नारी महिला बचत गटाच्या अध्यक्षा रजिना फ्रान्सिस, सुदर्शन स्पोर्ट्स क्लब मित्र मंडळाचे अध्यक्ष सचिन शिंगे, ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार जाधव , भूषण नांदूरकर, चिंचवड प्रवासी संघाचे अध्यक्ष गुलाम अली भालदार, माजी नगरसेविका उषा गजभार (चोरडिया ) योगशिक्षिका सरिता अग्रवाल, जनमन सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा श्वेता कापसे , बहुजन विकास आघाडीचे पुणे जिल्हा अध्यक्ष धनंजय घोलप, समाजसेविका राखी धर यांच्या हस्ते १५० गरजू व तळागाळातील महिलांना दिवाळी शिधा किटचे वाटप करण्यात आले तसेच त्यांनी यावेळी आपले मनोगतही व्यक्त केले. दिवाळी सण सर्वत्र आनंदात साजरात करण्यात येतो. गरजू व तळागाळातील विविध घटकांना देखील दिवाळी सण आनंदाने साजरा करता यावी, यासाठी पिंपरीतील प्रतिभा नारी महिला बचत गट, सुदर्शन स्पोर्ट्स क्लब मित्र मंडळांनी विशेष पुढाकार घेऊन दिवाळी सणाचे औचित साधत हा उपक्रम सामाजिक बांधिलकीतून राबविला.

कार्यक्रमाची प्रस्तावना अध्यक्षा रजिना फ्रान्सिस यांनी केले. सूत्रसंचालन सचिन शिंगे यांनी तर कार्यक्रमाचे संयोजन महिला बचत गटाच्या उषा लष्करे , कमल कलापुरे, वैशाली मिडघुले ,मंदा दौंडकर आदींनी केले.

## "प्रतिभा इंटरनॅशनल स्कूल 'इंडिया के - १२" पुरस्काराने सन्मानित

## शिक्षण विश्व: पुरस्काराने महाविद्यालयाच्या लौकिकात वाढ



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा इंटरनॅशनल स्कूलला पुणे येथे एल्डॉक इंडिया या नामांकित संस्थेतर्फे " अभिनव अध्यापन पद्धतीचा अवलंब करणे " या श्रेणीत ' इंडिया के - १२ पुरस्कार २०२५ ' हा प्रतिष्ठित पुरस्कार प्राप्त झाला आहे.**

हा पुरस्कार शाळेत राबविण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण अध्यापन उपक्रम, विद्यार्थीकेंद्रित शिक्षण प्रणाली आणि सर्वांगीण विकासावर भर देणाऱ्या कार्यपद्धतीबद्दल प्रदान करण्यात आला. या सोहळ्याचे आयोजन पुणे शहरातील कल्याणी नगर येथे करण्यात आले होते. शाळेच्या वतीने मुख्याध्यापिका वृंदा जोशी यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या वेळी उपस्थित प्रमुख पाहुणे, शिक्षणतज्ज्ञ आणि विविध संस्थांचे प्रतिनिधी यांनी प्रतिभा इंटरनॅशनल स्कूलच्या कार्याचे मनःपूर्वक कौतुक केले.

समारंभात मान्यवरांनी सांगितले की, प्रतिभा इंटरनॅशनल स्कूलने आपल्या कार्यातून नवोन्मेषी शिक्षणाचा आदर्श निर्माण केला असून, विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, संशोधन वृत्ती आणि नेतृत्वगुण विकसित करण्याचे कार्य शाळा प्रभावीपणे पार पाडत आहे. या सन्मानामुळे शाळेची प्रतिष्ठा केवळ पिंपरी चिंचवडच नव्हे, तर संपूर्ण पुणे जिल्ह्यात अधिक वृद्धिंगत झाली आहे.

या विशेष यशाबद्दल कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक आणि अध्यक्ष डॉ. दीपक शहा, खजिनदार डॉ. भूपाली शहा, तसेच संचालिका डॉ. तेजल शहा यांनी मुख्याध्यापिका वृंदा जोशी आणि संपूर्ण शिक्षकवर्ग तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सत्कार करून त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. त्यांनी सांगितले की, "शाळेचा हा पुरस्कार म्हणजे आमच्या शिक्षकवर्गाच्या कठोर परिश्रमाचे फळ असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशाच प्रेरणादायी उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाईल."

शाळेच्या मुख्याध्यापिका वृंदा जोशी यांनीही या यशाचे श्रेय व्यवस्थापन, शिक्षकवर्ग, विद्यार्थी आणि पालक यांना दिले. "विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची आवड आणि स्वावलंबनाची वृत्ती निर्माण करणे हे आमचे ध्येय आहे," असे त्या म्हणाल्या. या पुरस्कारामुळे प्रतिभा इंटरनॅशनल स्कूल शिक्षण क्षेत्रात एक नवा आदर्श निर्माण करत असून, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि आधुनिक अध्यापन पद्धतींच्या माध्यमातून भविष्यातील जबाबदार नागरिक घडविण्याचे कार्य अधिक जोमाने पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

## बळीराजाला शाब्दिक आधार

# आपुलकीच्या मदतीने पूरग्रस्त भारावले!

### राष्ट्रवादी काँग्रेस महिला शहराध्यक्षा प्रा. कविता आल्हाट यांची पूरग्रस्तांना मदत

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



पिंपरी चिंचवड प्रतिनिधी : मराठवाड्यासह सोलापूर जिल्ह्यामध्ये पावसाने धूमाकुळ घातला. अनेकांचे संसार, हातातोंडाला आलेली शेतातील पिके, गुरे-ढोरे पूरामध्ये वाहून गेले. बळीराजाला या संकटातून बाहेर करण्यासाठी सर्वत्र प्रयत्न सुरु आहेत. त्यामध्ये पिंपरी-चिंचवड शहरातून राष्ट्रवादीच्या महिला शहराध्यक्षा प्रा. कविता आल्हाट यांनीही पुढाकार घेतला. सोलापूर जिल्ह्यातील दोन गावांना प्रत्यक्षात जाऊन अन्नधान्यासह, साड्या, ऊबदार कपडे, टॉवेल, बिस्कीटांचे वाटप केले. आम्ही तुमच्या सोबत आहोत असा शाब्दिक आधाराही बळीराजाला दिला. सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यात मुंढेवाडी आणि अर्जुनसोंड या ठिकाणी सकाळी एक टेम्पोभरून सर्व साहित्य रवाना करण्यात आले. दोन्ही गावांमध्ये शेतकऱ्यांना या साहित्याचे वाटप केले. यावेळी सोलापूर जिल्ह्याच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला जिल्हाध्यक्षा वर्षा शिंदे यांच्यासह इतर महिला पदाधिकारी तसेच महिला शहराध्यक्षा प्रा. कविता आल्हाट यांच्या महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

पूरग्रस्त नागरिकांना मदत नव्हे तर कर्तव्य आहे, असे म्हणत सामाजिक बांधिलकी जपत प्रा. कविता आल्हाट यांच्यासह कुटूंबियांनी प्रत्यक्षात भेट देऊन साहित्य वाटप केले. बळीराजा संकटात अडकलेला आहे. संकटाच्या काळात एकमेंकाना मदतीचा हात देणं, साथ देणं ही आपली संस्कृती आहे.

नैसर्गिक आपत्तीमध्ये अनेकांचे संसार उध्दवस्त झाले आहेत. शेती खरडून गेली आहे. गुरे-ढोरे वाहून गेली त्यांच्या दुःखामध्ये खारीचा वाटा उचलण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. असा प्रयत्न सर्वांनी करून बळीराजाला संकटातून बाहेर काढण्याचा प्रयत्न करू.



www.rklgis.org

RKL GALAXY International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution

RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING

# ADMISSION OPEN FOR THE YEAR 2026-27

NURSERY - STD X

What we Offer?

- CBSE Curriculum
- Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
- Digital Classrooms with AV Facilities
- Skill Development Programs:
  Robotics
  Dance, Music, Speech & Drama
  Entrepreneurship
- Focus on Holistic Development

Enroll Now!



Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!

8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune